# कालीमातेची मुले

श्री. के. के. मेनन यांच्या

**Children of Kali**

या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद

साने गुरुजी
व
प्रा. डॉ. ग. ना. जोशी

रिया पब्लिकेशन्स्

**कालीमातेची मुले : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २५०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# कालीमातेची मुले

## प्रस्तावना

(कै.) पू. साने गुरुजींना योगायोगाने कोठून तरी सुंदर साहित्य अनपेक्षितपणे मिळावयाचे व ते साहित्य ते त्वरितच मराठी वाचकांना उपलब्ध करून द्यावयाचे. आतापर्यंत जगप्रसिद्ध अशा अनेक उत्कृष्ट कादंबऱ्या, नाटके व कथा यांचे स्वैर अनुवाद करून ते गुरुजींनी अत्यंत सोप्या भाषेत मराठी वाचकांना पुरविले आहेत. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याच्या अफाट पसाऱ्यात त्यांना खरे म्हणजे असे साहित्य मिळवायला फुरसद व स्वास्थ्य कधीच मिळत नसे. तरीही अचानकपणे केवळ योगायोगानेच असे सुंदर व सृजन साहित्य त्यांच्या हाती यावयाचे व फारसा विलंब न लावता गुरुजी ते मराठी वाचकांच्या हाती ठेवायचे. बाहेरच्या कार्यव्यापृत काळात गुरुजींना तसा वेळ कधीच मिळत नसे. त्यांना तशी सवड व तसे स्वास्थ्य केवळ कारावासात लाभावयाचे व त्याच वेळी ते आपली ग्रंथरचना करावयाचे. प्रस्तुत 'कालीमातेची मुले' ही अनुवादित कादंबरीही अशीच अचानकपणे मराठीत येत आहे. बेचाळीसच्या देशव्यापी व रोमहर्षक आंदोलनाच्या काळात गुरुजींना अटक करून नाशिकला कारावासात ठेवण्यात आले होते. त्यावेळी त्यांच्या समवेत अनेक महान व्यक्ती तुरुंगात होत्या. त्यात श्री. के. के. मेनन नावाचे गुरुजींचे एक निकटचे मित्रही होते. श्री. मेनन युद्धापूर्वी सिंगापूरकडे होते. जपानी लढा सुरू झाल्यावर ते स्वदेशात परत आले. मुंबईला आल्यावर तेही बेचाळीसच्या लढ्यात सामील झाले व म्हणून त्यांना नाशिकला स्थानबद्ध करण्यात आले. त्यांनी बंगालमधील अतिवर्षाव, पूर, दुष्काळ व मिदनापूर जिल्ह्यातील क्रांतिकारक प्रक्षोभ यांच्या पार्श्वभूमीवर Children of Kali नावाची एक सुरेख कादंबरी लिहिली. ती अद्याप अप्रकाशितच आहे. तिची एक टंकलिखित प्रत गुरुजींना मिळाली व ती मराठीत

आणण्याचे गुरुजींनी ठरविले. तिचा क्रमशः मराठी अनुवाद गुरुजींनी सुरू केला व तो 'विसावा' नावाच्या मासिकात प्रसिद्ध होऊ लागला. या कादंबरीचे मराठी भाषांतर करण्यास श्री. मेनन यांनी गुरुजींना आनंदाने परवानगी दिली. या कादंबरीची आरंभीची बावीस प्रकरणे गुरुजींनी स्वतः अनुवादित केली होती. त्यानंतर गुरुजी अचानकपणे देवाघरी गेले व कादंबरीची पुढील सर्व प्रकरणे तशीच पडून राहिली. परंतु ती कादंबरी पूर्ण करणे तर प्राप्त होते. म्हणून गुरुजींचे बंधू श्री. अप्पा साने यांनी मी पुढील सर्व प्रकरणांचा अनुवाद करून ही कादंबरी पूर्ण करून द्यावी अशी इच्छा मजजवळ व्यक्त केली व मीही त्यांना आनंदाने संमती दिली. 'कालीमातेची मुले' कादंबरी आज अशा रीतीने प्रकाशात येत आहे.

ही कादंबरी एका दृष्टीने फारच सुंदर आहे. या कादंबरीत तशी मोठी गुंतागुंतीची व परिणामकारक कथा नाही. सुरुवातीस कथेची गती जलद वाटते. एकामागून एक नाट्यमय घटना घडताना दिसतात. परंतु डॉ. विनोद यांना अटक झाल्यापासून पुढे कथा अत्यंत मंद गतीने वाट चालते. या भागात ठायी ठायी बौद्धिक व तात्त्विक चर्चाच अधिक चालतात. स्वामी आत्माराम, लीला, ज्योती, विनोद व गुप्ता हे आपल्या परीने जीवनातील व राजकारणातील विविध घटनांचा अर्थ लावीत असतात. स्वामी आत्माराम आपले सर्व विचार प्राचीन वैदिक व औपनिषदिक तत्त्वांवर आधारून बोलत असतात. प्राचीन भारतीय संस्कृतीविषयी त्यांना नितांत आदर वाटत असतो व तिचा भक्कम आधार घेतल्याशिवाय जीवनाचे सम्यक आकलन होणार नाही व जीवनाला इष्ट वळणही लावता येणार नाही अशी त्यांची दृढ श्रद्धा असते. ते अध्यात्मवादी भारतीय जीवनमूल्यावर सर्व भर देतात व जडवादाला अपुरा व असमाधानकारक ठरवू पाहतात. त्यांच्या उलट लीला व ज्योती, गुप्ता व नरेन यांची भूमिका असते. ती सर्व साम्यवादाच्या तत्त्वज्ञानाने भरलेली असतात. जगातील सध्याच्या सर्व विविध समस्या वास्तववादी परिवर्तनशील भौतिकवादी तत्त्वज्ञानानेच सुटू शकतील व त्या तशा रीतीनेच सोडवाव्या असा त्यांचा आग्रह असतो. भारतातील समाजवाद, साम्यवाद, गांधीवाद इत्यादी सर्व प्रचलित विचारप्रणाली या कादंबरीत अत्यंत स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. बंगालमध्ये अत्यंत भयानक स्वरूपाचा दुष्काळ पडला होता. लाखो स्त्री-पुरुष व मुले यांना खाण्यास न मिळाल्याने ती कुत्र्याच्या मौतीने मरत होती. यमाचे तांडव सुरू होते. अशा या दीनांना दयेने व सहानुभूतीने मदत करून वाचविण्यासाठी मानवतावादी कार्य ही सर्व मंडळी स्वामी आत्मारामांच्या प्रेरणेने करीत असतात. या भूमिकेविषयी मतभेद झाले व ते होणे साहजिक होते. उपासमारीतून क्रांतीची ठिणगी निर्माण होते व ती मानवाला त्याच्या बंधनांतून, दास्यातून व विषमतेतून मुक्त करते असा मार्क्सचा सिद्धांत आहे. तो सिद्धांत बंगालमध्ये खरा ठरला नाही. लक्षावधी माणसे दीनदुबळी होऊन उपाशीपोटी राहून मृत्युमुखी पडत होती, पण त्यातून क्रांतीची ज्वाळा भडकू शकली नाही. ही घटना एका दृष्टीने अभागी व विचार करायला लावणारी आहे. बंगालमध्ये जे घडले ते विचार करावयास लावते व एकूण क्रांतीचे शास्त्र कितपत खरे असते याविषयी मनात विचारांचा गोंधळ उडविते.

या कादंबरीत विविध दृष्टिकोनांतून जीवनाचा विचार केलेला आहे. स्वामी आत्मारामांची भारतीय तत्त्वज्ञान, वेदांत, उपनिषदे व गीता यावर प्रखर निष्ठा असते. ते सत्य, अहिंसा, संयम व तप या मार्गाने सर्व मानवी समस्या सोडवाव्यात असा आग्रह धरतात. मानवी जीवनमूल्ये ही सर्वोत्तम मानून व ती गृहीततत्त्वे म्हणून स्वीकारूनच व त्यांच्याच आधाराने इतर सर्व समस्या सुटल्या पाहिजेत असा आग्रह स्वामीजी धरतात. त्यांची ही गांधीवादास समान अशी विचारसरणी सर्वांना परिचित आहेच. तिच्या विरुद्ध दिशेला साम्यवादाचे जबरदस्त आकर्षण तरुण मनाला असलेले सापडते. साम्यवादात समता, बंधुभाव, श्रमजीवींची प्रतिष्ठा यांना सर्वांना अधिक महत्त्व देण्यात येते. समाजात चालू असलेले विविध प्रकारचे शोषण नाहीसे केले व सर्वांना आपापल्या विकासाला अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली म्हणजे समाज सुखी व पूर्ण होईल व या पार्थिव जगात त्यामुळे स्वर्ग निर्मिता येईल हा साम्यवादी सिद्धांत रंजल्यागांजल्यांना व दारिद्र्य व विषमता यांना विटलेल्या मनाला अतिशय आकर्षण व दिलासा देणारा वाटतो.

साधेपणा, कष्ट, संयम, इंद्रियसुखपराङ्मुखता, आत्मोन्नती, श्रम, अपरिग्रहावर अतिशय भर गांधीवादात दिला जात असल्याने सध्याच्या काळात तरी तो तरुण मनाला भारून टाकू शकत नाही. उलट सुखसाधनांच्या वस्तूंचे जास्तीत जास्त उत्पादन करून जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना भरपूर साधने उपलब्ध करून देऊन व त्यांचा समाजाच्या सामाईक कल्याणासाठी उपयोग करून सर्वांना अधिकाधिक सुख देण्याची व सर्वांना आपापल्या परीने काव्य, शास्त्र, विनोद, कला या मार्गाने

स्वतःचा विकास करून घेण्यासाठी पूर्ण व समान संधी देण्याची भाषा साम्यवाद बोलत असतो. साम्यवादात ध्येयाविषयीची प्रखर निष्ठा असूनही तो जीवनाला रुक्ष, नीरस व उग्र बनवीत नाही. उलट गांधीवादात साधेपणाचा अतिरेक झाल्याने शेवटी तो जीवनाला रुक्ष, नीरस व उग्र बनवितो, असे तरुण मनाला वाटते. साम्यवाद सर्वसामान्य मनुष्य आहे तसा गृहीत धरून त्याच्या मर्यादा व वृत्तीप्रवृत्ती लक्षात घेऊन त्याच्या पचनी पडेल व त्याला आवडेल असे आदर्श जीवनाचे चित्र माणसाच्या पुढे ठेवितो व ते सर्वसामान्य माणसाला अशक्यप्राय वाटत नाही. म्हणून ते सहज स्वीकारण्याची त्याच्या मनाची तयारी होते. म्हणून साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव अधिक पडतो व त्याला अनुयायित्व लवकर व पुष्कळ लाभते. याउलट गांधीवादाचे होत असावे. म्हणून या विचारप्रणालीला फारसे प्रभावी अनुयायित्व लाभत नसावे. स्वामी आत्मारामांसारखी अत्यंत विरळ अशी त्यागी, अत्यंत विचारशील, अपरिग्रही, व्रती माणसे समाजात क्वचितच पाहावयास मिळतात.

'कालीमातेची मुले' या कादंबरीत अशी विविध विचारांनी, मतांनी व श्रद्धांनी भारलेली माणसे आपापल्या परीने धडपडत असताना दिसतात. शेवटी ही सर्व माणसे एकाच आईची लेकरे आहेत हेच सत्य आहे. प्रत्येकजण स्वतंत्रपणे विचार करून स्वतःचे मत व श्रद्धा बनवीत असतो. प्रत्येकाचे स्वतःचे मत, स्वतःची श्रद्धा यावर खूप प्रेम असते. तरीही ही सर्व माणसे एकत्र राहून व एक प्रकारे अविरोधाने जगून स्वतःच्या मताप्रमाणे व कुवतीप्रमाणे आपापले कार्य करीत असतात. एकीकडे अत्यंत प्रखर बुद्धिवादाने व क्रांतीच्या भावनेने भारलेली लीला आहे, तर दुसरीकडे राजकारण व समाजकारण यात यत्किंचितही रस नसलेली पण प्राणांपलीकडे विनोदवर प्रेम करणारी व त्याच्या प्रेमाच्या आधारावर आनंदाने जगणारी अरुणा आहे.

आपल्या जीवनात अशा कितीतरी विविध प्रकारच्या व्यक्ती व त्यांच्या धडपडी पाहावयास सापडतात. ही सर्व माणसे त्यांच्यात कितीही मतभेद असले व त्यांच्या निष्ठा कितीही भिन्न असल्या तरी शेवटी आपण सर्व माणसे आहोत ही त्यांची मूलभूत भावना असते. त्या सर्वांची आई एकच असते. ती सर्व कालीमातेची मुले आहेत व तिला सर्व सारखीच वाटतात, असे श्री. मेनन यात दाखवीत असावेत. या कादंबरीत श्री. मेनन यांनी व्यक्तिमत्त्वाचे खूप वैविध्य दाखविले आहे. या सर्व व्यक्तींची राजकीय, सामाजिक व वैयक्तिक जीवनाविषयीची मते व आदर्श कितीही भिन्न असली तरी शेवटी ती सर्व जणू एकाच आईची मुले आहेत व म्हणून एकत्र राहतात, परस्परांविषयी आदर व सहिष्णुता राखून ती एकत्र राहून आपापली कामे करीत असतात असे दाखविलेले आहे. अनेकांच्या मागे एक ऐक्य असते, विविधतेत एकता असते, भेदात अभेद असतो असे जणू या कादंबरीत दाखविलेले आहे. या नवतेच्या ऐक्याचे मूलभूत अधिष्ठान मानवाच्या सामाजिक जीवनाला असले म्हणजे मग कितीही मतभेद झाले, निष्ठा विभिन्न झाल्या तरी मानव्याचा आधार कायम राहिल्याने परस्परांविषयी अनादर व असहिष्णुता न वाटता सर्वांना परस्परांशी सहकार्याने व प्रेमाने वागता येऊ शकते असे श्री. मेनन यांनी जणू या कादंबरीत दाखविले आहे. लहान मुलांचे जसे पावलोपावली मतभेद होतात, त्यावरून खटके उडून भांडणे होतात पण ती तात्पुरतीच ठरतात. पुनः ती सर्व एकत्र येऊन खेळू लागतात, हसू लागतात व पूर्वीच्या भांडणांची कटुता मनात न बाळगता मोकळ्या मनाने पुनः एकत्र खेळण्यात रमून जातात. तसेच आपल्या एकूण सामाजिक जीवनातही झाल्यास अधिक हितावह ठरेल. आपल्या सामाजिक जीवनातही मुलांची ही खेळाडूपणाची वृत्ती, सहजतेने मतभेद विसरून पुनः मनात त्याची कटुता व वैर न बाळगता मानवतेच्या व्यापक भूमिकेवरून जेथे जेथे व जेवढे सहकार्य शक्य होईल तेवढे सहकार्य परस्परांस देऊन, परस्परांस प्रेम व आदर दाखवून सहिष्णुतेने मोठ्यांनीही सामाजिक व राजकीय जीवन जगण्याचा प्रयत्न केल्यास राजकीय जीवनातील कटुता, कुत्सितता, वैर व तंगी कमी होऊन आपल्या सर्व सामाजिक व राजकीय चळवळी अधिक सहज, सुंदर व निरामय होतील आणि सामाजिक जीवनात अधिक निर्मळता, सोज्ज्वळता, उदारता, व्यापकता व माणुसकी यांचा विकास होईल. कदाचित याच रीतीने वाढता वाढता समाज हळूहळू उन्नत होईल, असे या कादंबरीच्या द्वारा श्री. मेनन सध्याच्या स्पर्धेच्या, कटकटीच्या व हेव्यादाव्याच्या काळात सांगत असावेत.

या कादंबरीत पुन्हा असेही दिसते की ही सर्व मुले अज्ञात अशा नियतीच्या पार्श्वभूमीवर जगत आहेत, वाढत आहेत. नियतीची अदृश्य शक्ती त्यांची जीवने घडवीत असते व नियंत्रित करीत असते. ज्या नियतीने अरुणा व विनोद यांचा मधुर प्रेमसंगम घडवून आणला, त्याच नियतीने त्यांच्यावर महान आपत्ती आणल्या, तिनेच विनोदला कारावास घडविला व तिनेच अरुणेचा अत्यंत करुण असा अंत करून त्या दोघांना परस्परांपासून कायमचे दूर नेले. नियती अशी काही विचित्र वस्तू आहे

की तिचे पूर्वज्ञान होऊ शकत नाही. तिची चाहूल आधी लागत नाही. मनुष्य विचार करतो एक व घडते काही निराळेच. ते कसे व का हे मानवी बुद्धीला आधी समजत नाही. मानवाने आपले जीवन आपल्या प्रखर बुद्धिवादाने विशिष्ट रीतीने घडवायचे ठरविले तरी शेवटी त्याला चकवून व त्याच्या सर्व योजना व संकल्प धुळीस मिळवून त्यांना पूर्णपणे निराळे वळण लावण्यास नियती कधी कचरत नाही. अरुणा व विनोद यांची हृदयंगम शोकांतिका ही नियतीच्या निर्दयी व क्रूर विलासाचे एक उघड उदाहरण होय. हीच नियती सर्वांच्या जीवनाची सूत्रे हलवीत असते. ती मानवी जीवनात एक सर्वात मोठे असे गूढ होऊन राहते.

'कालीमातेची मुले' ही कादंबरी मूळच्या इंग्रजी कादंबरीचा खराखुरा अनुवाद आहे. श्री. मेनन यांनी इंग्रजीत जे व जसे लिहिले आहे ते तसेच मराठीत आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही उणिवा व चुका राहिल्या असल्यास वाचक त्याबद्दल उदार मनाने क्षमा करतील व हा अनुवाद गोड करून घेतील, अशी आशा आहे.

६-१-१९५५ **– ग. ना. जोशी**
पुणे

# एक

बलुसिंह गावातील राय घराणे कोणाला माहीत नाही? प्रसिद्ध असे ते घराणे. परंतु बलुसिंह तालुक्याचे ठिकाण असले तरी विशेषशी हालचाल नसे. बंगालच्या नैऋत्य भागातील ते लहानसे गाव आणि त्या गावातील हे आमचे राय कुटुंब. कुटुंब छोटेसेच होते. सुखी होते. अशोक राय हे पेन्शनर गृहस्थ. पेन्शन घेताना ते प्रांत होते. पेन्शनही बरे होते. गावात कोठेही उत्सव समारंभ असला तर अशोक राय आपली पत्नी नि मुलगी घेऊन तेथे असायचेच. त्यांच्याशिवाय समारंभाला कोठली शोभा ? राय यांची पत्नी जरा लाजाळू होती. होती सुंदर, सडपातळ. खरे म्हणजे हे काही तिचे लाजण्याचे वय नव्हते. परंतु तिचा तो स्वभाव होता. ते श्रीमंत लाजणे होते म्हणा ना ! त्यांना एकच मुलगी होती. दिसायला मोठी गोड होती. परंतु तिचा चेहरा जरा निस्तेज वाटे; फिक्कट दिसे. ती का आजारी होती?

अशोक राय हे उत्सव समारंभाला थोडे उशिरा जायचे. मोठ्यांची ती सवय असते. मग सर्वांनी उठायचे, नमस्कार चमत्कार व्हावयाचे, या... या, बसा... बसा, इत्यादी उद्‌गार निघायचे. ती एक भारदस्त गंमत असते!

अशोक रायांची साठी पुरी झाली होती. ते अंगापिंडाने जरा जाडजूड होते. ते ठेंगण्यातच जमा झाले असते. चेहरा वाटोळा होता. दोहो बाजूंच्या खांद्याच्या कमानीवर तोंड ठेवलेले होते. त्यांची मान फारशी दिसतच नसे. सेवानिवृत्त झाल्यापासून त्यांचा मूळचा बडबड्या वाचाळ स्वभाव अधिकच बडबड्या झाला होता. कोणी दिसो, कोणी भेटो, त्याला त्यांनी हटकलेच समजा आणि मग ते बोलू लागायचे. मारुतीच्या शेपटीप्रमाणे ते बोलणे संपत नसे. मुले त्यांच्या विनोदी चेहऱ्याकडे बघून हसायची. या गृहस्थाची त्यांना गंमत वाटे. रायसाहेबांच्या तोंडाचा

पट्टा चालू असे. त्यांची सरस्वती कधी थकत नसे. त्यांच्या बोलण्याचा सदान्‌कदा एकच विषय असे.

'मी जेव्हा लहान होतो, मी जेव्हा तरुण होतो' अशा रीतीने ते लंबाळ बोलणे सुरू व्हायचे. बोलता बोलता ते भावनाभरात येत. त्यांच्या लठ्ठ गालांवर तजेला चमकू लागे. तोंड झाकून टाकणाऱ्या त्या मिशा जणू नाचू उडू लागत. नाक उलट्या प्रश्नचिन्हाप्रमाणे फुगे. आरंभी आरंभी या पेन्शनराची मुलांना गंमत वाटली. परंतु काय असेल ते असो, अलीकडे मुलांना त्यांची भीती वाटू लागली होती. ती मुले या म्हाताऱ्याला मोठ्या युक्तीने टाळीत. त्यांना त्यांचा वीट येई. थोडा गलिच्छ नि घामटही तो म्हातारा होता. त्यांच्या बोलण्याचा एक विषय म्हणजे ते स्वतः ! दुसरा विषय म्हणजे गांधी नि खादी! स्वतःची ते स्तुती करायचे. गांधी नि त्यांची खादी यावर भरपूर तोंड सोडायचे. यामुळे का मुलांना त्यांचा राग येई?

अशोक राय सेवानिवृत्त झाले तेव्हा त्यांनी बँकेत चांगलीच पुंजी ठेवली होती. ते पहिले महायुद्ध झाले ना, त्यावेळेस त्यांनी चांगलाच आर्थिक फायदा करून घेतला होता. अबकारी खात्यात आरंभी कारकून म्हणून ते नोकरीला लागले. महायुद्धाचे काळात अन्नधान्याचेही त्यांनी त्यावेळेस काम केले. त्यांची बढती झाली. सोळा वर्षांत ते प्रांतपदापर्यंत पोहोचले. तीन-चार लाख रुपये त्यांच्याजवळ होते. त्यांचा एकुलता एक मुलगा अमेरिकेत शिकायला गेला होता. तो तिकडेच आजारी पडून मेला. त्याच्या आजारीपणात त्यांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला होता. हातातोंडाला आलेला मुलगा गेल्याने त्यांच्या जीवनात जरा विरक्ती आली. पुरे आता नोकरी असं त्यांना वाटे. परंतु वेळ कसा जायचा असे मनात येऊन नोकरी सोडवेना. जेव्हा दुसरे महायुद्ध पेटले तेव्हा मात्र त्यांनी पेन्शन मागितले आणि ते या बलुसिंह गावाला येऊन राहिले. त्यांनी नोकरी सोडली खरी, परंतु युद्धकाळात पुन्हा एखाद्या खात्यात काम करावे असेही त्यांच्या मनात मधूनमधून येई. नोकरीचा त्यांना अजिबात वीट नव्हता आलेला.

त्यांच्या मुलीचे नाव अरुणा. चार मुले झाली, त्यातील ती शेवटची. चार मुलांतील दोनच वाचली. परंतु अमेरिकेत भाऊ वारल्यावर ती एकटीच उरली. तिच्यावर आता सारा जीव. तिचे वय २२ होते. ती उंच, सडपातळ, सुंदर होती. चेहरा रेखीव होता. एकदा तिच्या शाळेत गुरुदेव रवींद्रनाथ आले होते. त्या महाकवीला



माळ घालायचे भाग्य अरुणाला लाभले होते. तिच्याकडे बघून तो कवीसम्राट म्हणाला, ''बाळ, तुला पाहून चीनमधील एका उत्कृष्ट कलाकृतीची मला आठवण झाली. कलावान आणि कला या नावाचे ते चित्र होते.'' अरुणेचा चेहरा जरी जरा फिक्कट दिसला तरीही एखाद्या परीप्रमाणे ती रमणीय वाटे. तिचे केस लांब होते आणि खूप दाट होते. केसांच्या दोन वेण्या घालून दोन्ही खांद्यावरून ती सोडी. जणू दोन काळसर्पच ती अंगावर खेळवी. तिचे कपाळ रुंद होते, नितळ होते. डोळे काळेभोर आणि मोठे. नाक सुरेख, सरळ आणि तिचे दात खरोखरच मोत्यांप्रमाणे झळकत आणि ते मोती आत लपवू पाहणारे ते पातळ लाल ओठ. वाईट एकच वाटे की अशा सुंदर मुलीला आरोग्य नसावे. ती नेहमी आजारी असे. आज काय पडसे, आज काय ताप, आज काय डोके दुखणे, कधी कंबर दुखे, कधी पाय वळत. वर्षातून महिना दोन महिने तरी ती अंथरुणातच असायची. एकुलती एक मुलगी. अमेरिकेत भाऊ मेल्यावर तर ती आईबापांची जीव की प्राण झाली होती. अरुणा हाच काय तो त्या मायबापांचा आनंद होता. ती दोघं तिची अति काळजी घेत. त्या अति काळजीमुळेच ती आजारी पडे की काय? ती जरा बरी व्हायची, पुन्हा अंथरुणाला खिळायची. असे चाले.

अरुणाची आई मोठी गोष्टीवेल्हाळ होती. तिला खूप गोष्टी येत असत. अरुणा आईच्या गोष्टी ऐकत बसायची. जुनी गाणी, पुराणातील गोष्टी आईपासून मुलगी ऐके. अरुणाची आई म्हणजे जिवंत कथासरित्सागर. आईच्या दुधाबरोबरच प्राचीन संस्कृतीही अरुणाला मिळाली. सीता, सावित्री, द्रौपदी, दमयंती यांच्या कथा ऐकताना तिला कंटाळा नसे येत. तिच्या मनोबुद्धीला आईने सांगितलेल्या त्या कथांनी आकार दिला. सभोवतालच्या कंटाळवाण्या आणि गुदमरवणाऱ्या वातावरणाचा जरी तिच्या शरीरावर परिणाम झाला तरी तिच्या अंतरंगावर सीतासावित्रीचे अमर आदर्श कायमचे कोरले गेले होते. तिचा आत्मा त्या ध्येयांवर स्थिर झाला होता.

बलुसिंह गावात नवे-जुने फारसे काही नसे. रोज उठून तेच तेच सारे. तेथले फरक म्हणजे कधी या कारकुनाची बदली, नव्या कारकुनाचे येणे किंवा कधी कोणी मरे, तर कोणीकडे कोणी जन्मे. याहून विशेष नाविन्य असे तेथे नसे. परंतु एकाएकी त्या गावात जरा चैतन्य आले. गावात मोफत सरकारी दवाखाना होता. तेथे काम